महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई ● नवी मुंबई ● ठाणे ● पालघर ● रायगड

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रविंद्र घोडविंदे (एम.डी.)

रविवार ■ ०८ फेब्रुवारी २०२६ ■ वर्ष - सातवे ■ अंक : २२३ ■ RNI No. MAHMAR/2016/7209 ■ किंमत - ०२ रुपये





**लक्षवेधी**

## भाडेवाढ नव्हे, दर्जेदार सेवा द्या — परिवहनमंत्री प्रताप सरनाईक

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई :** 'इंधन आणि सुटे भागाची दरवाढ झाल्याने एसटीची भाडेवाढ करण्यात येणार असल्याच्या चर्चा सुरू आहेत. त्यावर भाडेवाढीपेक्षा गुणवत्तापूर्ण सेवेवर भर द्या,' असा सल्ला परिवहनमंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी एसटी अधिकाऱ्यांना दिला आहे. ते शुक्रवारी (ता. ६) मंत्रालयातील दालनात आयोजित 'उत्पन्नवाढ आढावा' बैठकीत बोलत होते. एसटीने गेल्या वर्षी १४.९५ टक्के दरवाढ केली होती. त्यामुळे प्रवाशांमध्ये नाराजीचा सूर होता.

सरनाईक म्हणाले की, 'बस वेळेवर धावल्या तरच उत्पन्नाची चाके वेगाने फिरतील, एसटी ही सर्वसामान्यांची जीवनवाहिनी आहे. किफायतशीर दर, सुरक्षित प्रवास आणि शासनाच्या विविध सवलतींमुळे प्रवाशांचा ओघ वाढत असताना सेवेत वक्तशीरपणा नसेल, तर ही वाढ टिकणार नाही. प्रवाशांना ताटकळत ठेवणे म्हणजे त्यांना पर्याय शोधायला भाग पाडणे, असा आहे.' तसेच दैनंदिन प्रवासात बस उशिरा सुटणे, रस्त्यात बंद पडणे किंवा अचानक फेऱ्या रद्द होणे, या तक्रारींचा पाऊस प्रशासनावर पडत असल्याचे त्यांनी नमूद केले. आगार पातळीवरील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी अधिक जबाबदारीने काम करून प्रत्येक फेरी नियोजित वेळी सुटेल याची खात्री करावी, असे आदेश त्यांनी दिले. या बैठकीला एसटी महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. माधव कुसेकर यांच्यासह सर्व विभागप्रमुख उपस्थित होते.

## क्रिकेटमध्ये टीम इंडियाची विजयी सुरुवात यूएसएवर 29 धावांनी मात



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई:** टीम इंडियाने आयसीसी टी 20i वर्ल्ड कप 2026 स्पर्धेत विजयी सलामी दिली आहे. टीम इंडियाने सूर्यकुमार यादव याच्या नेतृत्वात मुंबईतील वानखेडे स्टेडियममध्ये यूनायटेड स्टेट ऑफ अमेरिकेवर 29 धावांनी मात केली आहे. टीम इंडियाने सूर्याच्या झुंजार खेळीच्या जोरावर यूएसएसमोर 162 धावांचं आव्हान ठेवलं होतं. यूएसएच्या फलंदाजांनीही या धावांचा पाठलाग करताना चांगली झुंज दिली. त्यामुळे यूएसएही सामना जिंकू शकते, असं चित्र काही वेळ पाहायला मिळत होतं. मात्र भारताच्या चिवट आणि धारदार गोलंदाजीसमोर यूएसएला विजय काही मिळवता आला नाही. भारताच्या गोलंदाजांसमोर यूएसएला 20 ओव्हरमध्ये 8 विकेट्स गमावून 132 धावापर्यंतच पोहचता आलं. भारताने अशाप्रकारे वर्ल्ड कप मोहिमेची सुरुवात विजयाने केली.

# जिल्हा परिषद-पंचायत समिती निवडणुकीत ७०-७५ टक्के मतदान

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई:** संपूर्ण राज्याचे लक्ष लागून राहिलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचा बिगुल वाजले असून आज १२ जिल्हा परिषदा आणि त्यांतर्गत येणाऱ्या १२५ पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी मतदानाला उत्साहात सुरुवात झाली आहे. सकाळी ७:३० वाजल्यापासूनच मतदान केंद्रांवर मतदारांच्या लांबच लांब रांगा पाहायला मिळल्या आहेत.

राज्यातील ग्रामीण भागाचा कणा समजल्या जाणाऱ्या या निवडणुकीत एकूण ७३१ जिल्हा परिषद गट आणि १ हजार ४६२ पंचायत समिती गणांसाठी मतदान झाले. या महासंग्रामात ७ हजार ४३८ उमेदवारांचे राजकीय भवितव्य ईव्हीएम मशीनमध्ये बंद झाले. यासाठी सुमारे २ कोटी ८ लाख २० हजार ७०२ मतदार आपल्या मतदानाचा अधिकार बजावले. यामुळे राज्यातील प्रमुख राजकीय नेत्यांची प्रतिष्ठा पणाला लागली आहे.

### मतदारांना दोन मते द्यावी लागली

जिल्हा परिषदेच्या ७३१ जागांसाठी २,६२४ उमेदवार रिंगणात आहे. तर पंचायत समित्यांच्या १,४६२ जागांसाठी ४,८१४ उमेदवार नशीब आजमावत आहेत. या एकूण जागांपैकी ५० टक्के जागा महिलांसाठी राखीव आहेत. जिल्हा परिषदेत ३६९ तर पंचायत समित्यांमध्ये ७३१ जागांवर महिला उमेदवार निवडणूक लढवत आहेत. प्रशासनाने २५,४७१ मतदान केंद्रे उभारली असून, १ लाख २८ हजार कर्मचाऱ्यांची नियुक्ती केली आहे. सुरक्षेसाठी राज्यभर मोठा पोलीस फौजफाटा तैनात आहे. यावेळी मतदारांना दोन मते द्यायची आहेत. जिल्हा परिषद गटासाठी पांढऱ्या रंगाचे आणि पंचायत समिती गणासाठी गुलाबी रंगाचे बॅलेट युनिट मतदान केंद्रावर उपलब्ध आहे.



| एक्जिट पोल काय सांगतो ? | | | |
|---|---|---|---|
| एकूण जागा -731 | | | |
| भाजप 263 | शिंदेसेना 156 | NPC (AP) 118 | इतर 37 |
| काँग्रेस 61 | ठाकरेसेना 48 | NPC (SP) 42 | मनसे 06 |

### निकाल कधी?

आज सकाळी ७:३० ते सायंकाळी ५:३० पर्यंत मतदान पार पडले.या सर्व जागांचा निकाल ९ फेब्रुवारी २०२६ रोजी जाहीर होईल. सकाळी १० वाजल्यापासून मतमोजणीला सुरुवात होणार असून दुपारपर्यंत कोणत्या जिल्हा परिषदेवर कोणाची वर्णी, कोणती पंचायत समिती कोणाच्या ताब्यात जाणार, याचे चित्र स्पष्ट होणार आहे.

### किती जिल्हा परिषद आणि पंचायत समितींसाठी मतदान?

निवडणूक आयोगाच्या माहितीनुसार, प्रत्येक जिल्ह्यात किती जिल्हा परिषद गट (जागा) आणि किती पंचायत समित्यांसाठी मतदान झाले, याचा सविस्तर तपशील खालीलप्रमाणे आहे.

| जिल्हा | जिल्हा परिषद गट (जागा) | पंचायत समित्यांची संख्या |
|---|---|---|
| पुणे | ७३ जागा | १३ पंचायत समित्या |
| सोलापूर | ७२ जागा | ११ पंचायत समित्या |
| कोल्हापूर | ६७ जागा | १२ पंचायत समित्या |
| सातारा | ६४ जागा | ११ पंचायत समित्या |
| छत्रपती संभाजीनगर | ६३ जागा | ९ पंचायत समित्या |
| सांगली | ६१ जागा | १० पंचायत समित्या |
| रायगड | ५९ जागा | १५ पंचायत समित्या |
| लातूर | ५८ जागा | १० पंचायत समित्या |
| रत्नागिरी | ५६ जागा | ९ पंचायत समित्या |
| धाराशिव | ५५ जागा | ८ पंचायत समित्या |
| परभणी | ५३ जागा | ९ पंचायत समित्या |
| सिंधुदुर्ग | ५० जागा | ८ पंचायत समित्या |
| एकूण | ७३१ जागा | १२५ पंचायत समित्या |

## मुंबई महापौरपदी भाजपाच्या रितु तावडे यांची निवड

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई :** देशातील सर्वात श्रीमंत महानगर पालिका, जवळपास ४८ हजार कोटींचे बजेट असलेल्या मुंबई महानगर पालिकेवर अखेर भाजपाची सत्ता आली. त्यानंतर मुंबईचा प्रथम नागरिक म्हणजे महापौर कोण होणार याची उत्सुकता लागून राहिली होती. अखेर आज भाजपाने रितु तावडे यांचा महापौर पदाचा अर्ज भरला. मुंबईचे महापौरपद सर्वसाधारण महिला गटासाठी राखीव होते. येत्या ११ फेब्रुवारी रोजी मुंबईच्या महापौर पदाची निवड होणार आहे.आता रितू तावडे याच भाजपच्या मुंबईच्या पहिल्या महिला महापौर असणार आहेत. मात्र, देशाची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबई शहराच्या महानगर पालिकेवर यापूर्वी देखील सात महिला महापौर झाल्या आहेत. त्या कोणत्या ते पाहूयात....

मुंबई महापालिकेला आठव्यांदा मुंबईला महिला महापौर मिळणार आहे. यापूर्वी सात महिला महापौर झालेल्या आहेत. उद्धव ठाकरे यांची सत्ता आली तर मुंबई महानगर पालिकेचा महापौर खान असू शकतो अशी प्रचाराची सुरुवात भाजपाचे मुंबई अध्यक्ष अमित साटम यांनी केली होती. त्यानंतर एका कार्यक्रमात मुंबईचा महापौर हा मराठी असणार का ? असा सवाल पत्रकाराने केला असता भाजपाचे नेते आशीष शेलार यांनी शेवटपर्यंत मराठी हा शब्द न उच्चारता हिंदू होईल..हिंदू होईल असे पालपूद लावून ठेवले. त्यानंतर मुंबईचा महापौर हा हिंदू मराठी असेल इथपर्यंत प्रचाराची गाडी आली होती.



अखेर २५ वर्षांनी मुंबई महानगर पालिकेत बहुमत मिळाल्यानंतर भाजपा महापौर पदाची माळ कोणाच्या गळ्यात टाकणार याकडे लक्ष लागले होते. परंतू लॉटरीत हे पद सर्वसाधारण महिला गटासाठी राखीव झाले. उद्धव ठाकरे गटाने महापौर पदाच्या शयर्तीत उमेदवार उतरवण्याची पुडी सोडून दिली होती. परंतू आज महापौर पदाच्या उमेदवार म्हणून भाजपाचे नेते अमित साटम यांनी रितु तावडे यांचे नाव जाहीर केले. त्यानंतर शिवसेना नेत्या किशोरी ताई पेडणेकर यांनी भाजपाने मराठी महापौर दिल्याने आम्ही आता उमेदवार उतरवणार नाही असे सांगत सक्षम विरोधी पक्ष म्हणून काम करणार असे जाहीर केले.

### आतापर्यंतच्या महिला महापौर

**सुलोचना मोदी, काँग्रेस – १९५६**
**निर्मला सामंत प्रभावळकर, काँग्रेस – १९९४-९५**
**विशाखा राऊत, शिवसेना – १९९७-९८**
**डॉ. शुभा राऊळ,शिवसेना – २००७-२००९**
**श्रद्धा जाधव, शिवसेना – २००९-१२**
**स्नेहल आंबेकर, शिवसेना – २०१४ – २०१७**
**किशोरी पेडणेकर, शिवसेना -२०१९ – २२**

### काँग्रेसच्या सुलोचना मोदी पहिल्या महिला महापौर

१९५६ साली मुंबई महानगर पालिकेच्या ऐतिहासिक महापौर पदावर काँग्रेसच्या सुलोचना मोदी या पहिल्या महिला महापौर निवडून आल्या होत्या. यानंतर १९९४ पर्यंत ३८ वर्षे एकही महिला महापौर झाली नाही. १९९४-९५ या कार्यकाळात मुंबई महानगर पालिकेच्या महापौर पदावर काँग्रेसच्याच निर्मला सामंत प्रभावळकर या दुसऱ्या महिला महापौर म्हणून विराजमान झाल्या. त्यानंतर १९९७-९८ च्या काळात शिवसेनेच्या पहिल्या महिला महापौर होण्याचा विशाखा राऊत यांना मिळाला.

त्यानंतर साल २००७-२००९ या कार्यकाळात डॉ. शुभा राऊळ यांना शिवसेनेकडून महापौर पदांची संधी देण्यात आली. तर २००९-१२ या काळात शिवसेनेच्या श्रद्धा जाधव यांच्याकडे मुंबई महापालिकेच्या महापौर पदाची धुरा आली. साल २०१४ ते २०१७ या काळात शिवसेनेच्या महिला महापौर म्हणून स्नेहल आंबेकर यांनी मुंबई महापालिकेचा कारभार सांभाळला. साल २०१९ ते २२ च्या काळात शिवसेनेच्या किशोरी पेडणेकर या मुंबई महापालिकेत महापौर पदी होत्या. तर आता साल २०२५ ला मुंबई महापालिका निवडणुकीचे निकाल आले आणि २५ वर्षांनंतर शिवसेनेकडून भाजपाकडे महापौर पद आले आणि पुन्हा हे पद महिला आरक्षित झाल्याने महापौर पदी भाजपाच्या रितू तावडे विराजमान होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

## उद्यान-मैदाने अतिक्रमणमुक्त करण्याचा निर्धार- विशू पेडणेकर

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**डोंबिवली :** कल्याण डोंबिवली पालिका हद्दीतील उद्याने, बगिचे, क्रीडांगणे, मैदानांसाठी राखीव असलेले कल्याण डोंबिवली पालिकेचे आरक्षित भूखंड भूमाफियांनी हडप करून तेथे बेकायदा इमारती, चाळी उभारल्या आहेत.

शहरांमधील वाढत्या वस्तीच्या तुलनेत नागरिकांना मोकळी मैदाने, क्रीडांगणे, बगिचे, उद्याने उपलब्ध झालेली नाहीत. त्यामुळे येणाऱ्या पालिकेच्या पहिल्या महासभेत आपण पालिका हद्दीतील बगिचा, उद्याने, क्रीडांगणांसाठी आरक्षित असलेले, पण भूमाफियांनी बेकायदा इमारती बांधून हडप केलेले भूखंड पालिकेने ताब्यात घेण्यासाठी पुढाकार घ्यावा यासाठी लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून मागणी करणार आहोत, असे भाजपचे डोंबिवलीतील नगरसेवक विशू पेडणेकर यांनी सांगितले.

### भूखंड हडप

कल्याण डोंबिवली पालिकेची भविष्यवेधी वाढती लोकसंख्या संख्या विचारात घेऊन तीस वर्षापूर्वी नियोजनकारांनी विकास आराखड्यात शहरातील लोकसंख्येच्या प्रमाणात शहरात विभागवार शाळा, क्रीडांगणे, उद्यान, बगिचे, समाजमंदिरे, पोलीस ठाणी, न्यायालये, महावितरण केंद्र, मनोरंजन केंद्र अशा अनेक सुविधांसाठी एकूण १२१२ आरक्षणे आरक्षित ठेवली होती. मागील तीस वर्षाच्या कालावधीत या आरक्षणांमधील ६०० हून अधिक विविध सोयीसुविधांसाठीचे आरक्षित भूखंड भूमाफियांनी, काही मूळ मालकांनी सर्व प्रकारचे लाभ पालिकेकडून घेऊनही पुन्हा हडप करून तेथे बेकायदा इमारती, चाळी उभारल्या आहेत, अशी माहिती आहे.






## भिवंडी महापौरपदासाठी भाजप महायुती-काँग्रेसमध्ये रस्सीखेच

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी :** मुंबई, ठाणे,मीरा भाईंदर,कल्याण डोंबिवली व नवी मुंबई महानगरपालिकाआदी विविध महानगरपालिकेच्या निवडणूका मोठ्या जल्लोषात संपन्न झाल्या. मात्र अद्याप भिवंडी महानगर पालिकेची महापौर व उपमहापौर पदासाठी निवडणूक प्रक्रिया राजकीय डावपेचामुळे होत नसल्याने नागरिकांमध्ये व राजकीय पक्षाच्या पदाधिकाऱ्यां मध्ये तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे.भिवंडी महानगर पालिकेत कोणत्याही पक्षाला स्पष्ट बहुमत नसल्याने त्रिशंकू अवस्था निर्माण झाली आहे. त्यामुळे सत्ता स्थापन करण्यासाठी काँग्रेस व भाजप महायुतीच्या नगरसेवकांमध्ये जोरदार रस्सीखेच सुरु झाली आहे.

महापौर पदाच्या निवडणुकीत दगाफटका होऊ नये, या साठी बहुअंशी नगरसेवक भिवंडी शहराबाहेर निघून गेल्याने सत्ताधारी पक्ष व विरोधकांकडून त्यांचा शोध घेतला जात आहे. भाजपाने नारायण चौधरी या जेष्ठ नगरसेवकास उमेदवारी जाहीर केली असली तरी पक्षांतर्गत काही नगरसेवकांचा त्यांना विरोध आहे. त्यामुळे भाजपचे जेष्ठ नगरसेवक सुमित पाटील यांनी आपण महापौर पदाच्या निवडणुकीत उतरणार असल्याचे संकेत दिले असून त्यासाठी माजी केन्द्रीयमंत्री कपिल पाटील यांच्या मार्फत राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी संपर्क करीत आहेत.त्यामुळे भाजपमधील काही नगरसेवक, कार्यकर्ते आणि पदाधिकारी यांच्या अंतर्गत गटबाजी उफाळून आली असून समाजमाध्यम मार्फत दररोज वेगवेगळ्या बातम्या पेरल्या जात आहेत. महापालिका निवडणुकीमध्ये युती न करता स्वतंत्रपणे निवडणूक लढविणाऱ्या शिवसेना पक्षाला यावेळी १२ जागा मिळाल्या आहेत. त्यामुळे महापौर निवडणुकीत त्यांची भूमिका भाजप साठी निर्णायक आहे.मात्र अद्याप शिवसेनेने या बाबत उघडपणे कोणत्याही प्रकारची आपली भूमिका जाहीर केलेली नाही.दरम्यान भिवंडी महापालिकेत सत्तास्थापन करण्यासाठी शिवसेना देखील आघाडी नगरसेवकांच्या मदतीने इच्छुक झाली आहे.त्यासाठी शिवसेना उपनेते रुपेश म्हात्रे यांच्या नेतृत्वाखाली हालचाली सुरु झाल्याची चर्चा आहे. मात्र शिवसेनेचे पक्षप्रमुख एकनाथ शिंदे यांनी दिलेल्या निर्णयानुसार आमची भूमिका जाहीर करू तसेच पालिकेत महायुतीची सत्ता स्थापन होईल,अशी माहिती शिवसेनेचे उपनेते माजी आमदार रुपेश म्हात्रे यांनी दिली.महापौर व उपमहापौर निवडणुकीसाठी काँग्रेस व राष्ट्रवादी (शप) या पक्षांकडे प्रभावी उमेदवार नसल्याने सध्या ते कोणार्क विकास आघाडीचे माजी महापौर विलास पाटील व भिवंडी विकास आघाडीचे गटनेते जावेद दळवी यांच्याशी संपर्क साधून चर्चा करीत असल्याची माहिती सूत्राने दिली. या निवडणुकीत काँग्रेस पक्षाला सर्वाधिक ३० जागा मिळाल्याआहेत. तर राष्ट्रवादी पक्षाला १२ जागा व समाजवादी पक्षाला ६ जागा मिळाल्या आहेत. सत्ता स्थापन करण्यासाठी ४६ नगरसेवकांची आवश्यक्यता आहे. त्यामुळे कोणार्क विकास आघाडी व भिवंडी विकास आघाडीला सोबत घेऊन महापालिकेत सत्ता स्थापन करण्यासाठी काँग्रेसचे माजी आमदार तथा शहर जिल्हाध्यक्ष रशीद ताहीर मोमीन हे विशेष प्रयत्न करीत आहेत. त्यामुळे भाजपच्या गटामध्ये चलबिचल सुरु झाली आहे. महापालिकेच्या निवडणुकीत भाजप महायुतीला ३४ नगरसेवक संख्याबळ आहे.बहुमतासाठी ४६ हि मॅजिक फिगर असल्याने त्यांच्याकडून फोडाफोडीचे कारस्थान सुरु झाल्याची चर्चा शहरात आहे.त्यासाठी काही नगरसेवकांना भ्रमणध्वनीद्वारे संपर्क केला जात आहे. मात्र काही नगरसेवक शहराबाहेर असल्याने भाजप महायुतीचे नगरसेवक हवालदिल झाले आहेत. मागील महापौर पदाच्या निवडणुकीच्यावेळी काँग्रेस पक्षाच्या १८ नगरसेवकांनी पक्षादेशाचे उल्लंघन करीत बंडखोरी केली होती व त्यांनी विरोधी मतदान केले होते.परिणामी त्यांचे नगरसेवक पद रद्द झाले आहे. या घटने पासून धडा घेत सध्या निवडून आलेले नगरसेवक कोणताही दगाफटका होऊ नये म्हणून महापौर पदाच्या उमेदवाराला पाठिंबा देण्यासाठी सावधपणे पावले टाकत आहे.

### महापालिकेतील नगरसेवकांचे पक्षीय बलाबल

**पक्षीय बलाबल :- भाजप -२२, भारतीय राष्ट्रीय काँग्रेस-३०, शिवसेना (शिंदे )१२, राष्ट्रवादी काँग्रेस(शप )-१२, समाजवादी पक्ष-६, कोणार्क विकास आघाडी-४, भिवंडी विकास आघाडी-३, अपक्ष-१**

# पृथ्वीचा परिभ्रमण दिन

आपल्या ग्रहाच्या हालचालींबद्दलच्या सर्वात महत्त्वाच्या वैज्ञानिक शोधांपैकी एकाच्या स्मरणार्थ दरवर्षी ८ जानेवारी रोजी पृथ्वीचा परिभ्रमण दिन साजरा केला जातो. हा दिवस फ्रेंच भौतिकशास्त्रज्ञ लिओन फुकॉल्ट यांच्या १८५१ च्या प्रयोगाच्या वर्धापन दिनानिमित्त साजरा केला जातो , ज्याने पृथ्वी तिच्या अक्षाभोवती फिरते याचा स्पष्ट प्रायोगिक पुरावा दिला. पृथ्वीचे परिभ्रमण दैनंदिन जीवन, हवामान पद्धती आणि नैसर्गिक घटनांना कसे आकार देते हे लोकांना समजण्यास मदत करते.



### पृथ्वीचा परिभ्रमण दिन २०२६

पृथ्वीच्या अक्षांभोवती सतत फिरण्याबद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी ८ जानेवारी २०२६ रोजी पृथ्वीचा परिभ्रमण दिन साजरा केला जातो . हा दिवस १८५१ च्या ऐतिहासिक फुकॉल्ट पेंडुलम प्रयोगाचे प्रतीक आहे , ज्याने पृथ्वीच्या परिभ्रमणाचा स्पष्ट पुरावा दिला. ही नैसर्गिक हालचाल दिवस-रात्र चक्र नियंत्रित करते आणि हवामान आणि वारा नमुन्यांमध्ये महत्त्वाची भूमिका बजावते. हा प्रसंग मूलभूत पृथ्वी विज्ञान आणि खगोलशास्त्र समजून घेण्यास प्रोत्साहन देतो.

पृथ्वीच्या परिभ्रमण दिनाचा २०२६ चा इतिहास

पृथ्वी तिच्या अक्षाभोवती फिरते ही कल्पना प्रथम ग्रीक तत्वज्ञानींनी इ.स.पूर्व ४७० च्या सुमारास मांडली होती , जरी त्याला प्रायोगिक पुराव्यांचा अभाव होता.

अनेक शतके, शास्त्रज्ञांनी पृथ्वीच्या हालचालीवर वादविवाद केले, जोपर्यंत १९ व्या शतकात एक प्रगती झाली नाही .

१८५१ मध्ये , फ्रेंच भौतिकशास्त्रज्ञ लिओन फुकॉल्ट यांनी त्यांच्या प्रसिद्ध पेंडुलम प्रयोगाद्वारे पृथ्वीचे परिभ्रमण निर्णायकपणे सिद्ध केले , ज्यामध्ये ग्रह स्विंगिंग पेंडुलमच्या खाली फिरत असल्याचे दिसून आले.

### पृथ्वीच्या परिभ्रमणाबद्दल

पृथ्वीचे परिभ्रमण म्हणजे उत्तर ध्रुव आणि दक्षिण ध्रुव यांना जोडणाऱ्या काल्पनिक अक्षाभोवती ग्रहाचे सतत फिरणे.

पृथ्वीला एक प्रदक्षिणा पूर्ण करण्यासाठी अंदाजे २३ तास, ५६ मिनिटे आणि ४ सेकंद लागतात , ज्याला तारकाचा दिवस म्हणतात, तर सौर दिवस २४ तासांचा असतो.

पृथ्वी पश्चिमेकडून पूर्वेकडे फिरते, म्हणूनच सूर्य पूर्वेला उगवतो आणि पश्चिमेला मावळतो असे दिसते.

विषुववृत्तावर परिभ्रमण गती सर्वाधिक असते (सुमारे १,६७० किमी प्रति तास) आणि ध्रुवाकडे हळूहळू कमी होते.

पृथ्वीचा अक्ष सुमारे २३.५ अंशांनी कललेला आहे आणि हा कल, परिभ्रमण आणि क्रांतीसह, ऋतू आणि हवामानातील बदलांवर परिणाम करतो.

पृथ्वीचे परिभ्रमण दिवस-रात्र चक्रासाठी जबाबदार आहे , जे जैविक घड्याळे आणि सजीवांच्या दैनंदिन क्रियाकलापांचे नियमन करते.

या रोटेशनमुळे कोरिओलिस इफेक्ट होतो , ज्यामुळे उत्तर गोलार्धात वारे आणि समुद्राचे प्रवाह उजवीकडे आणि दक्षिण गोलार्धात डावीकडे वळतात.

चंद्राशी गुरुत्वाकर्षणाच्या संवादामुळे, पृथ्वीच्या परिभ्रमणाचा वेग हळूहळू कमी होत आहे, ज्यामुळे लाखो वर्षांत एका दिवसाच्या लांबीत हळूहळू वाढ होत आहे.

### पृथ्वीच्या परिभ्रमण दिनाचे महत्त्व २०२६

२०२६ चा पृथ्वीचा परिभ्रमण दिन पृथ्वीच्या अक्षीय हालचालीचे महत्त्व आणि ग्रहावरील नैसर्गिक प्रक्रियांना आकार देण्यात तिची भूमिका अधोरेखित करतो. हा दिवस लिओन फुकॉल्टच्या प्रयोगाचा देखील सन्मान करतो, ज्याने पृथ्वीच्या परिभ्रमणाची वैज्ञानिक समज स्थापित करण्यास मदत केली.

पृथ्वीवरील जीवनासाठी आवश्यक असलेले दिवस-रात्र चक्र स्पष्ट करते .

कोरिओलिस इफेक्टद्वारे हवामान प्रणाली आणि वारा परिसंचरण समजून घेण्यास मदत करते .

तास आणि दिवसांचा आधार बनवून वेळेचे मोजमाप नियंत्रित करते .

पृथ्वीच्या क्रांतीसह एकत्रित केल्यावर हवामान पद्धती आणि ऋतूंवर प्रभाव पडतो .

विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक उत्सुकता आणि पृथ्वी विज्ञान शिक्षणाला प्रोत्साहन देते .

# ‘श्री गजानन विजय’ ग्रंथ पारायण अवश्य करा

गण गण गणात बोते... गण गण गणात बोते...

माघ शुद्ध सप्तमीला शेगाव येथे संत श्री गजानन महाराज प्रकट झाले. गजानन महाराजांच्या प्रकट दिनाच्या निमित्ताने लाखो भाविक शेगावला जाऊन दर्शन घेतात. महाराष्ट्रातच नव्हे तर देश-विदेशातील असंख्य भक्तगणांचे गजानन महाराज श्रद्धास्थान आहेत. गजानन महाराज प्रकट दिनी लाखो भाविक शेगाव येथे जाऊन गजानन महाराजांचे दर्शन घेतात. आपापल्यापरिने गजानन महाराजांची सेवा करतात. ‘श्री गजानन विजय’ हा अतिशय पवित्र ग्रंथ असून, महाराजांच्या प्रकट दिनी याचे पारायण करता येऊ शकते. जाणून घेऊया... यंदा रविवार, ०८ फेब्रुवारी २०२६ रोजी श्री गजानन महाराज प्रकट दिन आहे. संत श्री दासगणू महाराज विरचित "श्री गजानन विजय ग्रंथ" हे गजानन महाराजांचे ओवीबद्ध चरित्र अतिशय प्रसिद्ध आणि लोकप्रिय आहे. या ग्रंथांतील ओव्यामध्ये गजानन महाराजांची महती, आध्यात्मिक तत्त्वज्ञान, जीवनाचे सार ओतप्रोत भरलेले आहे. काही ओव्या खूप विचार करायला भाग पाडतात. आणि जीवनाचे रहस्य जणू अलगद उलगडून टाकतात. भक्तगण या ग्रंथाचे नित्यनेमाने पारायण, वाचन करतात. एका दिवसांत श्री गजानन विजय ग्रंथ पारायण करता येऊ शकते.

‘श्री गजानन विजय’ ग्रंथ पारायण अवश्य करा श्री गजाननाच्या भक्तांच्या जीवनातील कोणतीही समस्या सोडवण्याचे सामर्थ्य “श्री गजाननविजय ग्रंथ” वाचनात आहे. श्री गजानन विजय ग्रंथ हा एक सामर्थ्य शाली ग्रंथ आहे. एकदा तरी वर्षातून घ्यावे गजाननाचे दर्शन अन् एकदा तरी पारायण करा श्री गजाननविजय ग्रंथाचे, असे म्हटले जाते. संपूर्ण ग्रंथाचे पारायण केले तर त्वरित आपल्याला इष्ट फळ मिळते असा भक्तांचा अनुभव आहे. श्री गजानन विजय ग्रंथातील प्रत्येक अध्यायाचे महत्त्व आणि महात्म्य वेगळे आहे. जीवनातील विविध समस्या, अडचणींवर श्री गजानन विजय हा ग्रंथ रामबाण उपाय मानला गेल्याचे सांगितले जाते. - एकआसनी पारायण: एका दिवसात एकाच बैठकीत (न उठता) संपूर्ण २१ अध्यायाचे पारायण करणे. ही पारायणाची अत्यंत उत्तम पद्धती आहे. वाचन गतीनुसार पारायणासाठी ४ ते ५ तास लागतात. गुरुपुष्यामृत योगावर केलेल्या एक आसनी पारायणाचे विशेष महत्त्व संत कवी दासगणू महाराजांनी सांगितले आहे.

- एक दिवसीय पारायण: एका दिवसात पहाटेपासून रात्री उशिरापर्यंत आपल्या सवडीनुसार २१ अध्यायाचे पारायण करता यू शकते. आजच्या धकाधकीच्या काळात एक आसनी पारायण करणे शक्य होत नाही. म्हणून एक दोन ब्रेक घेऊन बरीच भक्तमंडळी पारायण करतात. ते एकदिवसीय पारायण. जागतिक पारायण दिनाला वरील दोनपैकी एका पद्धतीचा वापर करणे अपेक्षित आहे. वेळेचे बंधन व व्यस्त जीवनप्रणाली ह्या गोष्टी लक्षात घेऊन आणखी काही पारायण पद्धतीचा वापर आपण करतो.

|| श्री गजानन जय गजानन || || गण गण गणात बोते ||

# प्रकट दिनानिमित्त महाराजांच्या २१ मौल्यवान शिकवणी

संत गजानन महाराज म्हणजे साक्षात परब्रह्म! "गण गण गणात बोते"चा मंत्र देत त्यांनी जगाला अद्वैताची शिकवण दिली. आजच्या धावपळीच्या, तणावाच्या आणि स्पर्धेच्या युगात शांत आणि समाधानी कसे राहावे, याचे उत्तर महाराजांच्या चरित्रात दडलेले आहे. या प्रकट दिनानिमित्त जाणून घेऊया त्यांच्या २१ मौल्यवान शिकवणी:



**१. ईश्वरी अस्तित्वाची जाणीव (गण गण गणात बोते)**

महाराजांचा हा मंत्र सांगतो की, प्रत्येक जीवामध्ये देव आहे. कोणाचाही तिरस्कार करू नका, कारण प्रत्येकात तोच परमेश्वर वास करतो.

**२. अन्नाचा मान राखा**

महाराजांनी उष्ट्या पत्रावळीतील अन्न खाऊन दाखवले की अन्न हे पूर्णब्रह्म आहे. अन्नाचा कणही वाया घालवणे म्हणजे ईश्वराचा अपमान आहे.

३. साधेपणातच मोठेपण

एवढी सिद्धी असूनही महाराज दिगंबर अवस्थेत राहिले. बाह्य डामडौलापेक्षा अंतर्मन स्वच्छ असणे महत्त्वाचे आहे.

**४. अहंकाराचा त्याग**

महाराजांसमोर मोठे श्रीमंत आणि राजे-महाराजे नतमस्तक झाले, पण महाराजांनी कधीही गर्व केला नाही. "मी" पणा सोडून वागा, यश नक्की मिळेल.

**५. निसर्गावर प्रेम करा**

कडाक्याच्या थंडीत किंवा उन्हात महाराज झाडाखाली किंवा उघड्यावर राहत. निसर्गाशी जुळवून घेणे हीच खरी प्रगती आहे.

६. कर्माला प्राधान्य द्या

महाराज म्हणायचे, आपले कर्म प्रामाणिकपणे करा. फळाची अपेक्षा करण्यापेक्षा प्रक्रियेवर लक्ष केंद्रित करा.

**७. जात-पात मानू नका**

महाराजांच्या दरबारात सर्व जाती-धर्माचे लोक येत. माणुसकी हाच श्रेष्ठ धर्म आहे, हीच त्यांची शिकवण होती.

**८. संयम आणि शांतता**

संकट आले तरी विचलित होऊ नका. शांत डोक्याने घेतलेला निर्णय नेहमीच योग्य असतो.

**९. लोभ धरू नका**

लोकांनी अर्पण केलेले दागिने किंवा धन महाराजांनी कधीही स्वतःकडे ठेवले नाही. गरजेपेक्षा जास्त साठा करणे हे दुःखाचे कारण आहे.

**१०. वाणीवर नियंत्रण**

महाराज फार कमी बोलत, पण जे बोलत ते सत्य असे. शब्दांचा वापर विचारपूर्वक करा, कारण शब्द कोणाचे तरी मन जोडू शकतात किंवा तोडू शकतात.

**११. निर्भय व्हा**

विंचू असो वा वाघ, महाराज कशालाही घाबरले नाहीत. मनात भक्ती असेल तर भीतीला स्थान उरत नाही.

**१२. संकटात संधी शोधा**

कोरड्या विहिरीत पाणी आणणे असो वा जळत्या गोवऱ्यांवर बसणे, त्यांनी प्रत्येक कठीण प्रसंगातून जगाला काहीतरी शिकवले.

**१३. गुरुंचे महत्त्व**

महाराजांनी स्वतःला नेहमी ईश्वराचा दास मानले. आयुष्यात योग्य मार्गदर्शकाचा शोध घ्या आणि त्यांच्यावर विश्वास ठेवा.

**१४. शिस्त पाळा**

शेगाव संस्थानाची शिस्त आजही आदर्श आहे. आयुष्यात शिस्त असेल तर कोणतीही गोष्ट साध्य करता येते.

**१५. आंतरिक सुखाचा शोध**

सुख हे बाह्य वस्तूंमध्ये नाही, तर ते आपल्या मनात आहे. ध्यान आणि भक्तीतून ते मिळवा.

**१६. दुसऱ्याला मदत करा**

जानराव देशमुखांचे प्राण वाचवून महाराजांनी दाखवून दिले की, दुसऱ्याच्या आयुष्यात प्रकाश आणणे हीच खरी सेवा आहे.

**१७. अंधश्रद्धेपासून दूर राहा**

महाराजांनी चमत्कार केले ते केवळ लोकांची श्रद्धा दृढ करण्यासाठी, चमत्कार दाखवण्यासाठी नाही. धर्माचे पालन करा, पण अंधश्रद्धेचे नाही.

**१८. वेळेचे महत्त्व**

प्रत्येक गोष्ट योग्य वेळीच घडते, त्यामुळे घाई करू नका. पण जे करायचे आहे ते आजच करा.

१९. शरीराची काळजी घ्या

महाराजांनी योगाभ्यास आणि प्राणायामाचे महत्त्व अधोरेखित केले. शरीर सुदृढ असेल तरच मन सुदृढ राहील.

**२०. समाधानी वृत्ती**

जे मिळाले आहे त्यात समाधान माना. धावपळ थांबवून थोडा वेळ स्वतःसाठी आणि ईश्वरासाठी काढा.

**२१. समर्पण भाव**

शेवटी सर्व काही त्या ईष्टाला अर्पण करा. जेव्हा तुम्ही पूर्णपणे शरण जाता, तेव्हा तुमच्या आयुष्याची जबाबदारी तो स्वतः घेतो.

गजानन महाराजांच्या या २१ शिकवणी केवळ वाचण्यासाठी नसून त्या आचरणात आणण्यासाठी आहेत. या प्रकट दिनी आपण संकल्प करूया की, त्यांच्यातला किमान एक गुण तरी आपण स्वतःमध्ये बाणवू.

बोला...

श्री गजानन महाराज की जय!

# भिवंडीतील माजी महापौर विलास पाटील यांना अटकपूर्व जामीन मंजूर

## महापौर पदाच्या निवडणुकीत नवा वळण..




दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी :** भिवंडी शहरातील कोणार्क विकास आघाडीचे प्रमुख व माजी महापौर विलास आर पाटील व त्यांचा मुलगा नगरसेवक मयुरेश पाटील यांना आज शनिवारी भिवंडी न्यायालयाकडून अटकपूर्व जामीन मंजूर करण्यात आला आहे.त्यामुळे त्याचे समर्थक व कुटुंबातील सदस्यांनी समाधान व्यक्त केले आहे.

विलास पाटील यांना अटकपूर्व जामीन मंजूर झाल्याने आता भिवंडी महापालिकेच्या महापौर पदाच्या निवडणुकीत मोठी उलथापालथ होऊन महापालिकेत सत्ता स्थापन करण्यासाठी मोठी चुरस निर्माण झाली आहे.माजी महापौर पाटील यांना बहुतांश नगरसेवकांचा छुपा पाठिंबा आहे त्यामुळे ते महापौर पदाच्या निवडणुकीच्या मैदानात येणार असल्याची अटकळ बांधली जात आहे.

भिवंडी शहर महापालिका निवडणुकीनंतर कोणार्क विकास आघाडीचे माजी महापौर विलास पाटील व भाजप आमदार महेश चौगुले यांच्या समर्थकांमध्ये निवडणूक निकालानंतर जोरदार हाणामारी झाली होती. या प्रकरणी दोन्ही गटातील सुमारे ५१ जणांवर निजामपुरा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्यात कोणार्क विकास आघाडीचे माजी महापौर विलास पाटील व त्यांचा मुलगा नगरसेवक मयुरेश पाटील यांच्यावर देखील गुन्हा दाखल करण्यात आला होता.त्यामुळे शहरातील राजकीय वातावरण दुषित झाले होते.

न्यायालयात जामीन मिळावा यासाठी दोन्ही बाजूने समर्थकांची धावपळ सुरू होती.

त्यामुळे आज शनिवारी माजी महापौर विलास पाटील व त्यांचा मुलगा मयुरेश पाटील यांना अटक पूर्व जामीन मंजूर करण्यात आला असून कोणार्क विकास आघाडीतील एकूण २३ जणांना तर भाजपच्या ३ जणांना अशा एकूण २६ जणांना भिवंडी न्यायालयातून जामीन मंजूर झाले आहे.माजी महापौर विलास पाटील यांना जामीन मंजूर झाल्याने आता महापौर पदाच्या निवडणुकीतील चुरस आणखीन वाढली आहे.

शुक्रवारी भाजपकडून नारायण चौधरी यांच्या नावाची महापौर पदासाठी अधिकृत घोषणा जाहीर करण्यात आली.या घोषणेनंतर भाजपचे नगरसेवक व माजी केंद्रीय मंत्री कपिल पाटील यांचे पुतणे सुमित पाटील यांनी नाराजी व्यक्त केल्याने भाजपमध्ये दोन गट पडले आहेत. त्यातच आज विलास पाटील यांना अटकपूर्व जामीन मंजूर झाल्याने महापौर पदाच्या निवडणुकीची चुरस आणखी वाढली आहे.

# विज्ञान परिषदेत 39 शोधनिबंध

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**नवी मुंबई :** रयत शिक्षण संस्थेच्या वाशी येथील कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयात 'स्वच्छ खाडी चळवळी' अंतर्गत व जागतिक पाणथळ भूमी दिनानिमित्त राष्ट्रीय परिषदेचे आयोजन केले होते. पर्यावरण दक्षता मंडळाने सुरू केलेल्या परिषदेचे हे २६ वे वर्ष आहे. चेन्नई येथील केअर अर्थ ट्रस्टच्या डॉ. जयश्री वेंकटेशन यांनी परिषदेचे उद्घाटन केले. परिषदेत ३९ शोधनिबंध आणि ४ पोस्टर्स विविध महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांनी सादर केले. परिषदेत महाराष्ट्र आणि आंध्र प्रदेशातील २२ वेगवेगळ्या संस्थांमधील एकूण २२५ विद्यार्थी आणि प्राध्यापक सहभागी झाले होते. पाणथळ भूमी संवर्धनाच्या क्षेत्रातील डॉ. उमेश मुंडल्ये, डॉ. मेधा ओक, डॉ. पुरुषोत्तम काळे, मॅग्रोव्ह फाउंडेशनचे ऋषिकेश राणे, पर्यावरण दक्षता मंडळाचे विद्याधर वालावलकर, डॉ. प्रसाद कर्णिक आणि डॉ. संजय जोशी, डॉ. प्रवीण नायक, डॉ. रेश्मा पितळे यांनी विद्यार्थ्यांना देशातील विविध पाणथळ भूमींवरील सध्या सुरू असलेले संशोधन कार्य, मोहिमा, चळवळी आणि संवर्धनाच्या प्रयत्नांवर भाष्य केले.

निसर्गातील मानवी हस्तक्षेप हा पक्षी, सरपटणारे प्राणी, उभयचर प्राणी इत्यादींच्या अधिवासांना कसा बाधा पोहोचवत आहे यावरही प्रतिपादन केले. यावेळी पाणथळ भूमी छायाचित्रण स्पर्धा, लघुपट स्पर्धा, सर्जनशील पोस्टर स्पर्धेतील विजेत्यांना गौरविण्यात आले. परिषदेचे नियोजन महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. शुभदा नायक यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.

# कल्याणमधील गजानन महाराज मंदिरावर रोषणाई



गजानन महाराज यांच्या प्रकट दिनानिमित्त कल्याणच्या ठाणकरपाडा, मनीषानगर परिसरातील मंदिरावर रोषणाई करण्यात आली आहे. मंदिर प्रशासनाकडून सध्या जय्यत तयारी सुरू असून विविध धार्मिक कार्यक्रमही होणार आहेत.

# 422 किल्ल्यांच्या नावांतून साकारले शिवछत्रपतींचे ऐतिहासिक आविष्कारक चित्र




दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** प्रो. डॉ. दिनेश गुप्ता यांनी छत्रपती शिवाजी महाराजांनी जिंकलेल्या ४२२ किल्ल्यांच्या नावांपासून साकारलेले शिवछत्रपती महाराजांचे एक अद्वितीय व आविष्कारक चित्र निर्माण करून इतिहास, कला आणि संशोधन यांचा अप्रतिम संगम घडवून आणला आहे.

या प्रेरणादायी कलाकृतीची प्रेरणा त्यांना मागील वर्षी मिळाली, जेव्हा छत्रपती शिवाजी महाराजांशी संबंधित १२ ऐतिहासिक किल्ल्यांना युनेस्कोने ‘जागतिक वारसा’ दर्जा प्रदान केला. त्या क्षणी त्यांनी संकल्प केला की महाराजांच्या पराक्रमाचे प्रतीक असलेले सर्व किल्ले एका चित्रामध्ये साकार करून भावी पिढीसाठी जिवंत इतिहास निर्माण करायचा. हे संपूर्ण पोर्ट्रेट साकारण्यासाठी डॉ. गुप्ता यांना सलग दोन दिवस लागले. या निर्मितीतील सर्वात महत्त्वाचा व आव्हानात्मक टप्पा म्हणजे ४२२ही किल्ल्यांवर सखोल संशोधन, त्यांची अचूक नावे, ऐतिहासिक संदर्भ आणि त्या सर्वांना शिवाजी महाराजांच्या तेजस्वी व्यक्तिमत्त्वात कलात्मकरीत्या रूपांतरित करणे. हे चित्र केवळ एक कलाकृती नसून- हे छत्रपती शिवाजी महाराजांच्या शौर्याचा दस्तऐवज, भारतीय इतिहासाच्या गौरवाचे दृश्य रूप आणि राष्ट्रप्रेरणेचे जिवंत प्रतीक आहे.

प्रो. डॉ. दिनेश गुप्ता यांचा हा आविष्कारक उपक्रम इतिहास, राष्ट्रभक्ती आणि सर्जनशीलतेला नवी दिशा देणारा ठरतो.

# भविष्यवेध



रविवार
०८ फेब्रुवारी २०२६

**मेष**
नववर्षाच्या सुरूवातील तुम्ही तुमच्या कुटुंबासह धार्मिक स्थळाला भेट देऊ शकता. या राशीच्या विवाहित लोकांसाठी आजचा दिवस खूप चांगला आहे.

**वृषभ**
तुमच्या मुलाच्या यशामुळे आनंद मिळेल. तुमचे वैवाहिक जीवन सुखाने भरलेले असेल. आज एका खास नातेवाईकाची भेट होईल.

**मिथुन**
तुम्हाला उर्जेने परिपूर्ण वाटेल. आज तुम्ही हाती घेतलेले कोणतेही काम वेळेपूर्वी पूर्ण होईल. तुम्ही वैवाहिक संघर्ष सोडवण्याचा प्रयत्न कराल.

**कर्क**
मित्रांसोबत एखाद्या विशिष्ट विषयावर चर्चा केल्याने तुम्हाला फायदा होऊ शकतो. आज धैर्य आणि संयम वाढेल. नवीन वर्षआंची सकारात्मक सुरूवात होईल.

**सिंह**
कोणतेही मोठे आर्थिक व्यवहार करताना सावधगिरी बाळगली पाहिजे. तसेच आर्थिक लाभाचे नवीन स्रोत उदयास येऊ शकतात.

**कन्या**
आज तुम्ही ऑफिसची प्रलंबित कामं पूर्ण करण्यावर भर द्याल, त्यामुळे खांद्यावरून मोठं ओझं उतरेल. रखडलेले काम आज पुन्हा सुरू कराल.

**तुळ**
व्यवसायिक त्यांच्या पार्टनर्सशी व्यावसायिक बाबींवर चर्चा करण्यासाठी भेटतील. वाढत्या नफ्यामुळे कापड व्यापारी खूश होतील.

**वृश्चिक**
मनासारखे निर्णय होतील. कामावर यश मिळेल. विद्यार्थ्यांकडून झालेला थोडीशी निष्काळजीपणा निराशेला कारणीभूत ठरू शकतो; कठोर परिश्रम करत रहा.

**धनु**
तुमच्या मुलांकडून तुम्हाला चांगली बातमी मिळेल. घरातील वातावरण आनंददायी राहील. अडकलेले व्यवसायिक पैसे परत मिळू शकतात.

**मकर**
आज अनपेक्षित घटनांपासून सावध रहा. सकारात्मक दृष्टिकोन राखल्याने तुम्ही हाती घेतलेले सर्व काही चांगले होईल याची खात्री होईल.

**कुंभ**
तुम्ही एखाद्या क्रीडा स्पर्धेत सहभागी होऊ शकता. या राशीत जन्मलेल्या आणि नोकरी करणाऱ्यांना चांगल्या ऑफर मिळण्याची शक्यता आहे.

**मीन**
तुमचा कल अध्यात्माकडे अधिक असेल. दिवस तुमच्यासाठी आनंद घेऊन येईल. योजना अमलात आणाल, फायदा वाढेल. कठोर परिश्रम करत रहा.

# डबक्यात बुडून सहा वर्षांच्या मुलीचा दुर्दैवी अंत

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे** - दिवा येथील शिळफाटा परिसरात शुक्रवारी सायंकाळी मित्र मैत्रिणींसह खेळत असताना एका ६ वर्षीय मुलीचा डबक्यात पडून मृत्यू झाल्याची घटना शनिवारी उघडकीस आली आहे. या प्रकरणी डायघर पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवली असून पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे.

कशफ नबीला खान (०६) असे मृत मुलीचे नाव आहे. ती शिळफाटा येथील आशना हाईट्स येथे राहत होती. शुक्रवारी सायंकाळी ५ वाजताच्या सुमारास ती आपल्या मित्र मैत्रिणींसह घराशेजारील परिसरात खेळत होती. यावेळी खेळत असताना परिसरात सुरू असलेल्या बांधकामाच्या ठिकाणी ती पोहचली. दरम्यान ती पाण्याच्या डबक्यात तोल जाऊन पडली. त्यानंतर तिच्या कुटुंबियांनी शोध घेण्याचा प्रयत्न केला. मात्र, ती कुठेही सापडली नाही. म्हणुन त्यांनी पोलिसात तक्रार नोंदवली. घटनेची माहिती मिळताच, घटनास्थळी शिळ अग्निशमन केंद्राचे स्थानक अधिकारी, डायघर पोलीस ठाण्याचे अधिकारी आणि कर्मचारी तसेच अग्निशमन दलाचे जवान दाखल झाले. त्यांनी तिचा शोध सुरू केला तेव्हा पाण्याच्या डबक्यात तिचा मृतदेह आढळून आला. डायघर पोलिसांच्या उपस्थितीमध्ये तिचा मृतदेह पुढील कार्यवाहीकरिता कळव्यातील छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात पाठविण्यात आला आहे.

# मुरबाडमध्ये भव्य पारायण व पालखी सोहळ्याचे आयोजन

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**मुरबाड :** महाराष्ट्रात वर्षभर ग्रंथराज श्रीज्ञानेश्वरीची पारायणे होत असतात. मात्र, अनुष्ठानपूर्वक पारायण हे मुरबाड येथील परायणाचे वैशिष्ट्य आहे. वेदमुर्ती गुरुवर्य श्रीराम जोशी यांनी ही प्रासादिक परंपरा मुरबाड येथे सुरू केली आणि ती अव्याहतपणे गेली एकोणतीस वर्षे सुरू आहे. यानिमित्त दीपोत्सव व पालखी सोहळयाचे आयोजनही करण्यात आले आहे.

रविवारी (ता. ८) सकाळी ९ वाजता ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायणाची सांगता होणार आहे, तर सायंकाळी ४ वाजता भव्य पालखी सोहळा आयोजित केला आहे. त्यानंतर सायंकाळी ७ वाजता मान्यवरांच्या शुभ हस्ते दिव्य असा दीपोत्सव पार पडणार आहे. त्यानंतर सोमवारी (ता. ९) रोजी १० ते १२ या वेळेत संतसाहित्याचे साक्षेपी तत्वचिंतक हरिभक्तीपरायण वैष्णव भूषण श्रीमहंत प्रमोद महाराज यांचे काल्याचे कीर्तन होईल. कीर्तनानंतर हजारो भाविकांकरिता महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. पालखी सोहळा, दीपोत्सवास आणि महाप्रसाद यासाठी भाविकांनी मोठ्या संख्येने हजर रहावे, असे आवाहन मुरबाड तालुका भागवत वारकरी समाजसेवा मंडळाने केले आहे.

**विद्वान वक्त्यांची कीर्तने**
**यंदा पारायणास दोनशे वाचक बसले असून, श्रद्धापूर्वक पारायण सुरू आहे. पुणे येथील मंदारशास्त्री खळदकर यांची दररोज श्रीरामरक्षा या विषयावर प्रवचने सुरू आहेत. तसेच दररोज महाराष्ट्रातील ख्यातनाम अशा विद्वान वक्त्यांची कीर्तन होत असून भाविक श्रवणसुखाचा लाभ घेत आहेत.**

# हेच कटू सत्य आहे



ज्या माणसाचा प्रामाणिक पणा हा त्याच्या अंतर्मनाशी जागृत झालेला असतो अशी माणसं फक्त आणि फक्त आपल्या चांगल्या कर्माला महत्व देऊन ह्या मनुष्य जन्माला सार्थक बनवतात आणि पुढच्या जन्माचा प्रवास सुखद करून घेतात.अशी माणसं मोह मायेच्या खेळात कधीचं अडकत नाहीत .कारण त्यांचा आत्मा चेतनामय असल्यामुळे ते शरीराला भोगी बनवून देत नाही.फक्त त्याना वाईट वाटत असते की ह्या कलियुगात त्यांचा प्रामाणिक पणा त्यांच्या कुटुंबाला जास्त सुख देऊ शकत नाही.मात्र अशा कुटुंबाची नवीन पिढी लहानपणा पासून आपल्या आई-वडिलांचे संघर्ष,त्याग आणि समर्पण बघून संस्कारमय आदर्शांचे धडे घेऊन मोठे होत असतात.परिणामी अशी मुलं भविष्यात आपल्या आयुष्याला चांगलं वळण देऊन दुसऱ्यांना सुद्धा आदर्श शिकवून जातात आणि समाधानी जीवन जगण्याचा प्रयत्न करतात.

मात्र ज्या माणसांचा आत्मा चेतनाशी जोडलेला नसतो अशी माणसं फक्त आणि फक्त भौतिक सुखाचा जास्तीत जास्त सुख कसं उपभोगता येईल यासाठी स्टेटस,सत्ता,पद आणि श्रीमंतीच्या अहंकारात जीवन जगत असतात.परिणामी त्यांचे जीवन जगण्याचे साधन बघून त्यांची मुलं म्हणजेच त्यांची आजची नवीन पिढी संस्कार हीन असल्यामुळे त्यांना फक्त आणि फक्त शॉर्ट कट मार्गाने कसं श्रीमंत होऊन भौतिक सुखाचे सुख उपभोगता येईल ह्याचेच चिंतन झालेले असते.

अशी मुलं आदर्शवादी न बनता चुकीच्या मार्गाने चुकीची संगत करून भरकटतात.
अशी मुलं कधी समाधानी जीवन जगू शकत नाही आणि परिणामी असे कुटुंब कर्मभोगी बनून ह्या जीवनाच्या शेवटच्या टप्प्यात अनेक आजारांनी ग्रस्त होऊन मन दुःखी होऊन शेवटचा निरोप घेतात आणि पुढच्या जीवनाचा प्रवास संचित कर्मा मुळे प्रारब्धामुळे दुःखमय करून घेतात.

त्यामुळे कोणाचे जीवन किती श्रीमंतीने भरले आहे हे बघण्यापेक्षा आपल्या जीवनाचा प्रत्येक टप्पा सद्भक्ती आणि सत्कर्माने मोह मायेला बळी न पडता किती समाधानी करता येईल आणि आपल्या आत्म्याला परमात्माची जोड देऊन किती चेतनामय करता येईल ह्याचे सतत आत्मचिंतन असावे.

येणारा काळ खूप काही शिकवून जाणारा आहे.आता माणसाच्या हातात फक्त आणि फक्त स्वयं परिवर्तना शिवाय काही पर्याय उरणार नाही आहे असे नियतीचे खेळ भविष्यात होणार आहेत.म्हणून आता पासूनच समाधानी जीवन जगायचा मार्ग स्वीकारा..
हेच कटू सत्य आहे.
तुम्ही स्वीकारा किंवा नका स्वीकारू.
मात्र परिणाम ज्याच्या त्याच्या विचार शैली वर अवलंबून आहे.
*राम कृष्ण हरी*

**स्मिताक्षी मंगेश आंबेकर**
**उर्फ स्मिताक्षी सूर्यकांत चिपळूणकर**

# बी.एन.एन. महाविद्यालयाच्या ग्रंथालय इमारतीचे भूमिपूजन

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**भिवंडी** : ग्रंथालय म्हणजे केवळ वाचनाचे केंद्र नसून संवाद, चिंतन आणि विचारप्रक्रिया समृद्ध करणारे केंद्र आहे. अशा ग्रंथालयाचा लाभ निश्चितच विद्यार्थ्यांना होईल. बी.एन.एन. महाविद्यालयाचे नवीन ग्रंथालय भिवंडी शहरातील सर्वात मोठे ग्रंथालय ठरेल, असे प्रतिपादन भिवंडी महापालिकेचे आयुक्त अनमोल सागर यांनी केले. ते पद्मश्री अण्णासाहेब जाधव भारतीय समाज उन्नती मंडळ संचालित बी.एन.एन. महाविद्यालयाच्या नवीन ग्रंथालय इमारतीच्या भूमिपूजन समारंभप्रसंगी बोलत होते.

संस्थेचे अध्यक्ष डॉ. विजय जाधव यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या या सोहळ्यात संस्थेचे कार्याध्यक्ष बाळकृष्ण काळे, पदाधिकारी श्रीराम भोईर, आर. एन. पिंजारी, प्रभारी प्राचार्य डॉ. शशिकांत म्हाळुंकर, सहाय्यक उपायुक्त सुरेंद्र भोईर, मंदार लेले, दुर्राज कामणकर, जियाद मोमिन, उपप्राचार्य डॉ. सुधीर निकम, डॉ. निनाद जाधव, डॉ. सुरेश भदरगे, डॉ. कुलदीप राठौड, प्रबंधक नरेश शिरसाळे, कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य एम. ओ. महाले, पर्यवेक्षक श्रीकांत पाटील, डॉ. बाबासाहेब आंबेडकर विधी महाविद्यालयाचे प्राचार्य अजिंक्य कांबळे, पद्मश्री अण्णासाहेब जाधव विद्यालयाचे मुख्याध्यापक सुधीर घागस, मातोश्री उषाताई जाधव मॅनेजमेंट अँड रिसर्च सेंटरचे विजय वंजारे तसेच महाविद्यालयाचे सर्व प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मयोगी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्या धस यांनी केले, तर आभार प्रभारी प्राचार्य डॉ. शशिकांत म्हाळुंकर यांनी मानले.

# भिवंडी महानगरपालिकेत 'आशा दिवस' साजरा

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**



**भिवंडी** : दिनांक 6/2/2026 रोजी भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेतर्फे मुख्य वैद्यकीय आरोग्य विभाग अंतर्गत माननीय प्रशासक तथा आयुक्त श्री अनमोल सागर (भा प्र से) यांच्या प्रमुख उपस्थितीत व मार्गदर्शनानुसार स्व. राजय्या गाजेंगी हॉल कोंबडपाडा येथे मोठ्या उत्साहाने आशा दिवस साजरा करण्यात आला. सर्वप्रथम स्वागत गीत घेण्यात आले व दीप प्रज्वलनचा कार्यक्रम संपन्न झाला माननीय आयुक्त महोदयांनी आशा सेविकांच्या आरोग्य सेवेत दिलेल्या योगदानाबद्दल त्यांची प्रशंसा केली, तसेच शासनाच्या विविध योजना राबवण्याबाबत केलेल्या कामाबद्दल त्यांचे कौतुक करून अजून चांगले काम करण्यासाठी प्रोत्साहन दिले. तसेच उत्कृष्ट अशा सेविका म्हणून प्रथम क्रमांक साधना डुंबरे (ईदगाह आरोग्य केंद्र) द्वितीय क्रमांक तबस्सुम मोमिन (गायत्रीनगर आरोग्य केंद्र) तृतीय क्रमांक फैमिदा अन्सारी (स्लॉतर हाऊस आरोग्य केंद्र) तसेच एकूण 19 आरोग्य केंद्रातील प्रत्येकी एक आशा सेविका ह्याप्रमाणे प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला. माननीय अतिरिक्त आयुक्त श्रीमती नयना ससाणे यांनी आशा सेविकांची वैद्यकीय आरोग्य विभागातील भूमिका अत्यंत महत्त्वाची असल्याबाबत अधोरेखित केले. गरोदर माता, लसीकरण,कुपोषण निर्मूलन, कुटुंब नियोजन तसेच विविध शासन योजने विषयी केलेल्या जनजागृती कामांबद्दल कौतुक केले. त्यानंतर आशा सेविकांनी गायन व नृत्य अशाप्रकारचे सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. सदर कार्यक्रमात मा.प्रशासक तथा आयुक्त श्री अनमोल सागर (भा. प्र.से.), श्रीमती नयना ससाणे, मा. अतिरिक्त आयुक्त (२), श्री संदीप गाडेकर,मा. मुख्य वैद्यकीय अधिकारी, श्रीमती वर्षा बारोड-चौधरी RCH अधिकारी,डॉ. बुशरा सैय्यद वैद्यकीय अधिकारी, वैद्यकीय विभागाचे अधिकारी व आशा सेविका इत्यादी उपस्थित होते.

# गोविंद नगर येथे नागरी आयुष्मान आरोग्य मंदिर सुरू

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**भिवंडी :** भिवंडी महानगरपालिका वैद्यकीय आरोग्य विभागामार्फत गोविंद नगर येथे नागरी आयुष्मान आरोग्य मंदिर सुरू करण्यात आले आहे. या आरोग्य मंदिराच्या माध्यमातून स्थानिक नागरिकांना प्राथमिक आरोग्य सेवा, तपासण्या तसेच विविध आजारांवरील उपचार सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. या संदर्भात भिवंडी महानगरपालिकेचे मा. प्रशासक तथा आयुक्त श्री अनमोल सागर तसेच वैद्यकीय आरोग्य विभाग, भिवंडी महानगरपालिका यांच्या वतीने गोविंद नगर व आसपासच्या परिसरातील सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येत आहे की, त्यांनी या नागरी आयुष्मान आरोग्य मंदिरामध्ये उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या वैद्यकीय सुविधांचा लाभ घ्यावा. सार्वजनिक आरोग्य सेवा अधिक सुलभ व प्रभावी व्हाव्यात या उद्देशाने ही सुविधा सुरू करण्यात येत असून नागरिकांनी याचा जास्तीत जास्त उपयोग करावा, असेही आवाहन करण्यात आले आहे.

# एप्सटीन फाइल्सप्रकरणी कल्याणमध्ये काँग्रेसचा चक्का जाम



**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण** : कल्याण मध्ये एप्सटीन फाइल्सच्या मुद्द्यावरून काँग्रेस आक्रमक भूमिकेत आली असून, कल्याण पश्चिममध्ये युवक काँग्रेसकडून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विरोधात जोरदार आंदोलन करण्यात आले. कल्याण पश्चिमेतील छत्रपती शिवाजी महाराज चौकात मो ठ्या संख्येने काँग्रेस कार्यकर्ते एकत्र जमले होते. यावेळी कार्यकर्त्यांनी पंतप्रधान मोदी यांच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी करत, त्यांच्या राजीनाम्याची मागणी केली.

आंदोलनादरम्यान कार्यकर्त्यांच्या हातात एप्सटीन–मोदी, भाई–भाई असे आक्षेपार्ह पोस्टर्स झळकत होते. याचवेळी काँग्रेस कार्यकर्त्यांनी रस्त्यावर बसून चक्का जाम करण्याचा प्रयत्न केला, त्यामुळे काही काळ वाहतुकीवर परिणाम झाला. आंदोलन उग्र होत असल्याची शक्यता लक्षात घेता बाजारपेठ पोलिसांनी तात्काळ कारवाई करत काँग्रेसच्या अनेक नेत्यांसह कार्यकर्त्यांना ताब्यात घेतले. आंदोलनादरम्यान मराठी चित्रपट झपाटलेला मधील प्रसिद्ध पात्र तात्या बिंचू यांच्या वेशभूषेत एक आंदोलक दिसून आला, जो उपस्थितांचे विशेष लक्ष वेधून घेत होता.

# सौ. कमलताई किसन कथोरे म्हसा महाविद्यालयात व्यावसायिक शिक्षणावर व्याख्यान

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**



**म्हसा :** पारंपरिक शिक्षण तर विद्यार्थी घेत असतातच पण सध्याच्या युगात या शिक्षणाबरोबरच व्यावसायिक शिक्षण ही तितकेच महत्त्वाचे आहे, याच अनुषंगाने सौ. कमलताई किसन कथोरे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय म्हसा येथे दि. ०७ फेब्रुवारी, २०२६ रोजी सकाळी १०.०० वाजता कॉमर्स विभागामार्फत व्यावसायिक शिक्षण या विषयावर व्याख्यान कार्यक्रम आयोजित करण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी तथा मार्गदर्शक मा. प्रा. उल्हास गायकर सर उपस्थित होते. सर जीवनदीप महाविद्यालय गोवेली येथे प्राध्यापक म्हणून कार्यरत असून ते BMS विभागाचे विभागप्रमुख आहेत. महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. योगेश माळी सर यांनी गायकर सरांचं गुलाब पुष्प देऊन स्वागत केलं त्यांनतर आपलं मनोगत व्यक्त केलं. त्यानंतर कॉमर्स विभाग प्रमुख प्रा. हर्षदा पवार मॅम यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. विद्यार्थ्यांनी पदवी प्राप्त केल्यानंतर MBA सारखी व्यावसायिक पदव्युत्तर पदवी मिळवावी आणि यासाठी सामायिक प्रवेश परीक्षा कशी द्यावी त्यासाठी लागणारे कागदपत्रे, परीक्षा पद्धती, इत्यादींवर विशेष असे मार्गदर्शन सरांनी केलं. यानंतर विद्यार्थ्यांच्या प्रश्नांना समाधानकारक अशी उत्तरे सरांकडून मिळाली. यावेळी सर्वच विभागातील विद्यार्थी उपस्थित होते. तसेच सर्व विभागाचे प्राध्यापक प्राध्यापिका उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन नियोजनाची जबाबदारी कॉमर्स विभागाच्या प्रा. हर्षदा पवार मॅम, प्रा. दिक्षा बोटकुंडले मॅम व प्रा. विजय सोनार सर यांनी पार पाडली. याकामी प्रा. संदिप भावार्थे सर तसेच प्रा. दिनेश शेळके सर यांची मदत झाली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी जीवनदीप शैक्षणिक संस्थेचे अध्यक्ष मा. श्री. रविंद्र घोडविंदे सर, संचालिका मा. सौ. स्मिता घोडविंदे मॅम, संचालक मा. श्री. प्रशांत घोडविंदे सर, महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. योगेश माळी सर यांचे सहकार्य तथा मार्गदर्शन लाभले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन प्रा. विजय सोनार सर यांनी केलं. या व्याख्यानामुळे विद्यार्थ्यांच्या ज्ञानात नक्कीच भर पडली.






# आरोग्यसेवांच्या बळकटीचा निर्धार

## सामाजिक कृती गटाचे आंदोलन

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**पालघर** : कुपोषण, आरोग्यसेवांच्या गंभीर समस्येमुळे २०१४ला पालघर स्वतंत्र जिल्हा म्हणून घोषित करण्यात आला; मात्र ११ वर्षे उलटूनही शासनाच्या इच्छाशक्तीअभावी जिल्ह्यात रुग्णालय नसल्याने पालघर सामाजिक कृती गटाच्या वतीने जव्हार अपर जिल्हाधिकारी कार्यालयासमोर मंगळवारी (ता. १०) धरणे आंदोलन करण्यात येणार आहे.

जिल्हा रुग्णालय व त्यासंबंधित कामे निधीअभावी रखडलेली आहेत. परिणामी, जिल्ह्यातील नागरिकांना आरोग्यसेवांसाठी खासगी रुग्णालये, तसेच मुंबई व गुजरात विशेषतः सिल्वासा येथे पाठवले जात आहे. मनोर येथील ट्रॉमा रुग्णालयही निधीअभावी पूर्णत्वास गेलेले नाही. जव्हार उपजिल्हा रुग्णालय २०० खाटांचे करण्याचे आश्वासन देण्यात आले होते; परंतु त्याबाबत कोणतीही प्रगती दिसत नाही. पालघर येथील वैद्यकीय महाविद्यालय व महिला रुग्णालयाबाबत करण्यात आलेल्या घोषणांचीही अंमलबजावणी झालेली नाही. प्रस्तावित ग्रामीण रुग्णालये, आरोग्य केंद्रे व उपकेंद्रांची कामे विविध कारणांनी रखडलेली आहेत. याशिवाय, आरोग्य विभागातील अनेक पदे रिक्त आहेत. विशेषतः आरोग्यतज्ज्ञांची पदे तातडीने भरणे आवश्यक आहे. औषधांचा तुटवडा आणि मूलभूत आरोग्य सुविधांचा अभाव, समस्याही गंभीर स्वरूपाच्या आहेत. या सर्व बाबींकडे शासनाचे दुर्लक्ष होत असल्याने पालघर सामाजिक कृती गटाने आंदोलनातून प्रशासनाचे लक्ष वेधण्यात येणार आहे.

# दीर्घ मागणीनंतर कल्याण–जुगाईवाडी एसटी बससेवा सुरू

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**



**कल्याण** : कल्याणमध्ये स्थायिक असलेल्या सातारकर रहिवाशांच्या अनेक वर्षांच्या मागणीला अखेर यश आले आहे. कल्याण ते जुगाईवाडी (सातारा) या नवीन एसटी बससेवेची नुकतीच दिमाखात सुरुवात झाली आहे. या थेट सेवेमुळे चाकरमानी, विद्यार्थी आणि सातारा परिसरात नियमित प्रवास करणाऱ्या नागरिकांचा प्रवास आता अधिक सुखकर होणार आहे.

बससेवेसाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, खासदार डॉ. श्रीकांत शिंदे आणि परिवहनमंत्र्यांकडे सातत्याने पाठपुरावा करण्यात आला होता. या लोकहिताच्या सेवेचे उद्घाटन शिवसेना शहरप्रमुख महेश गायकवाड यांच्या हस्ते भगवा झेंडा दाखवून करण्यात आले. प्रवाशांनी या सुविधेबद्दल आनंद व्यक्त करत प्रशासनाचे आभार मानले आहेत. कल्याण एसटी आगाराचे काम सध्या प्रगतिपथावर असल्याने ही बस तात्पुरती विठ्ठलवाडी आगारातून सुटणार आहे. विठ्ठलवाडी ते जुगाईवाडी बसचे दररोज रात्री ९ वाजता प्रस्थान होईल. जुगाईवाडी येथून दररोज सकाळी ६ वाजता परतीचा प्रवास सुरू करेल.

**प्रवाशांना मोठा दिलासा**

रात्रीच्या वेळी बसची सुविधा उपलब्ध झाल्यामुळे कामावरून घरी परतणारे नागरिक आणि विद्यार्थ्यांना आपल्या प्रवासाचे नियोजन करणे सोपे झाले आहे. कल्याण आणि सातारा या दोन शहरांमधील दळणवळण सुलभकरण्याच्या दृष्टीने हे एक महत्त्वाचे पाऊल मानले जात आहे. "सर्वसामान्य नागरिकांच्या सोयीसाठी शिवसेना सदैव तत्पर असून, ही बससेवा सातारकरांच्या प्रवासातील कष्ट कमी करेल," असा विश्वास महेश गायकवाड यांनी या वेळी व्यक्त केला.

# पगारवाढीच्या मागणीसाठी घंटागाडी कामगारांचे आंदोलन

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण:** कल्याण-डोंबिवली पालिकेच्या कचरा उचलणाऱ्या कंत्राटदार कंपनीच्या कामगारांनी शुक्रवारी काम बंद आंदोलन केले. त्यामुळे शहरात सकाळच्या सत्रात कचरा उचलला गेला नाही. दुपारच्या सत्रात आश्वासन दिल्यावर काम बंद आंदोलन मागे घेण्यात आले.
महापालिकेने सुमित एल्को प्लास्ट या कंपनीला कचरा उचलण्याचे कंत्राट दिले आहे. या कंपनीकडून स्वच्छतेचा केरळ पॅटर्न राबविला जात आहे. या कंपनीच्या कचरा गोळा करणाऱ्या घंटागाड्यावरील कामगारांनी शुक्रवारी सकाळी काम बंद आंदोलन केले. कामगारांना पगारवाढ दिली जात नाही. कामगारांच्या प्रलंबित मागण्यांकडे कंपनी व्यवस्थापनाकडून दुर्लक्ष केले जात असल्याचा आरोप घंटा गाडीवर काम करणाऱ्या कामगारांनी केला आहे. खंबाळपाडा येथील कचरा डेपोवर हे आंदोलन केले. दुपारच्या सत्रात कामगारांना कंपनी व्यवस्थापनाकडून आश्वासन दिल्यानंतर घंटागाड्या कचरा डेपोबाहेर काढल्या. कचरा कंत्राटदार कंपनीच्या विरोधात महापालिका प्रशासन कारवाई का करीत नाही? असा सवाल कामगारांनी यावेळी उपस्थित केला.
पालिकेकडे असलेले सफाई कामगारांचे मनुष्यबळ कमी आहे. त्यामुळे सात प्रभागातील कचरा उचलण्याचे कंत्राट खासगी कंपनीला दिले गेले. काही महिन्यांपूर्वी कंत्राटी कचरा कामगारांनी खंबाळपाडा कचरा डेपोत काम बंद आंदोलन केले होते. त्यावेळीही कामगारांची केवळ आश्वासनावर बोळवण केली होती. दिलेल्या आश्वासनांची पूर्तता न केल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा कंत्राटी कचरा कामगारांनी महापालिकेसह कंत्राटदार कंपनीला दिला आहे.

# हज यात्रेकरूंसाठी भिवंडी पालिकेत विशेष लसीकरण मोहीम



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी** : मुस्लिम समाज बांधवांसाठी " हज यात्रा " धर्मिक भावनेतून अत्यंत पवित्र अशी यात्रा मानली जाते. जगभरातून लाखो मुस्लिम धर्मीय समाज बांधव प्रार्थना करण्यासाठी तेथे जात असतात.तिथे जाण्यापूर्वी हज यात्रेकरूंची नियमानुसार आरोग्य तपासणी ही अत्यंत महत्त्वाची असते त्यामुळे भिवंडी महापालिकेच्यावतीने हज यात्रे करूना रोगप्रतिकारक लस देण्यासाठी पालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागाच्यावतीने विशेष लसीकरण मोहीम राबविण्यात येत आहे.विशेष म्हणजे ठाणे जिल्ह्यात अशा पद्धतीने लसीकरण फक्त भिवंडीत उपलब्ध करून देण्यात आले असुन शेकडो हज यात्रेकरूनी त्याचा लाभ घेत आहेत.

भिवंडी महापालिकेच्या मुख्य इमारती मध्ये स्वतंत्र कार्यालय स्थापन करण्यात आले असुन भिवंडी, भिवंडी ग्रामीण,शहापूर, बोरीवली,कल्याण, मुंब्रा, ठाणे येथील हज यात्रेकरूनी या लसीकरण मोहिमेचा लाभ घेण्यासाठी गर्दी करत आहेत.

**जिल्ह्यातील ७०० यात्रेकरूंनी घेतला लाभ**

वैद्यकीय अधिकारी डॉ आयेशा,फार्मसिस्ट आसिफ अन्सारी, पंकज सिंह, राजश्री दाभाडे यांचासह परिचारिका यांनी ही लसीकरण मोहीम यशस्वी करण्यासाठी विशेष मेहनत घेत आहेत.शुक्रवार पासून सुरु असलेल्या या विशेष मोहिमेत आता पर्यंत ७०२ हज यात्रेकरूंनी लाभ घेतला असून पुढील दोन दिवस हे लसीकरण सुरू राहणार असल्याची माहिती वैद्यकीय विभागाकडून देण्यात आली.

# केडीएमसी आयुक्तांनी शास्त्रीनगर रुग्णालयास अचानक भेट

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : कल्याण डोंबिवली महापालिका आयुक्त अभिनव गोयल यांनी शनिवारी सकाळी साडेआठ वाजता डोंबिवली पश्चिम येथील शास्त्रीनगर सामान्य रुग्णालयाला अचानक भेट दिली. यावेळी त्यांनी रुग्णालयात दैनंदिन स्वरूपात केली जाणारी स्वच्छता, उपलब्ध औषध साठा, रुग्णांना दिल्या जाणाऱ्या सेवा सुविधा इत्यादी बाबींचा आढावा घेतला तसेच रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांची आपुलकीने विचारपूसही केली.
यावेळी त्यांनी नवजात अतिदक्षता विभाग, बालरोग अति दक्षता विभाग या विभागांची तसेच इतर विभागांची देखील पाहणी केली त्याचप्रमाणे रुग्णालयात चालू असलेल्या दुरुस्ती कामाची देखील पाहणी केली. महापालिका रुग्णालयातील रुग्ण काही वेळेस तातडीने इतर रुग्णालयात संदर्भित करावे लागतात यासाठी एसओपी तयार करण्याच्या सूचना त्यांनी उपस्थित वैद्यकीय अधिकारी यांस दिल्या.



## रुग्णांची केली आपुलकीने विचारपूस

रुग्णालयाच्या ओपीडीमध्ये केस पेपर काढण्यासाठी त्याचप्रमाणे अपघात कक्षात रोकड रक्कम देऊन केस पेपर काढण्याच्या प्रक्रियेस लागणारा वेळ पाहता, केस पेपर काढण्यासाठी क्यूआर कोड आधारित प्रणालीचा अवलंब करण्याचे निर्देश त्यांनी उपस्थित डॉक्टरांना दिले तसेच रुग्णांना दिल्या जाणाऱ्या सुविधेमध्ये कुठल्याही प्रकारची हयगय काय होता कामा नये असे स्पष्ट निर्देश त्यांनी उपस्थित वैद्यकीय अधिकारी यांना दिले.
यावेळी शास्त्रीनगर सामान्य रुग्णालयाच्या मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ.सादिया पिंजारी, डॉ. विनोद दौंड, बालरोगतज्ञ डॉ. हेमराज देवरे उपस्थित होते.

# ठाणे रेल्वे स्थानक परिसरात मोबाइल चोरीचे सत्र सुरूच

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** ठाणे रेल्वे स्थानकात २४ तासांत लोकलमधील गर्दीचा तसेच झोपलेल्या प्रवाशांचा फायदा घेत चोरट्यांनी तब्बल सहा प्रवाशांचे महागडे मोबाइल लंपास केल्याच्या घटना घडल्या. या सहा घटनांमध्ये सुमारे अडीच लाख रुपयांचे मोबाइल चोरीस गेल्याने प्रवाशांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.
पहिल्या घटनेत बदलापूर येथील रहिवासी सारंग राणे (२६) हे ४ फेब्रुवारी रोजी मित्रासोबत कळवा येथे कामानिमित्त आले होते. कळवा स्थानकातून डोंबिवलीकडे जाणाऱ्या लोकलमध्ये गर्दीत चढताना त्यांच्या डाव्या खिशातील मोबाइल चोरीस गेला. चोरीस गेलेल्या मोबाइलची किंमत सुमारे १ लाख २० हजार असल्याचे त्यांनी तक्रारीत नमूद केले आहे. दुसऱ्या घटनेत दिवा येथील विजय मस्के (४०) हे ४ फेब्रुवारी रोजी सायंकाळी कळवा फलाट क्रमांक २ वरून लोकलमध्ये चढताना त्यांच्या खिशातील ४२ हजार ९९९ रुपये किमतीचा मोबाइल चोरीस गेला.तिसऱ्या घटनेत डोंबिवली येथील रूपेश वालावलकर (३२) हे सायंकाळी ठाणे स्थानकात कल्याण लोकलमध्ये चढत असताना चोरट्याने त्यांचा २४ हजार ९९९ रुपये किमतीचा मोबाइल चोरला. चौथ्या घटनेत मुंबईतील विनोद कुमार गुप्ता (३५) हे ३ फेब्रुवारी रोजी आसनगावहून सीएसटीकडे येणाऱ्या लोकलने प्रवास करत होते. रात्री कळवा स्थानक ओलांडल्यानंतर जाग आल्यावर त्यांच्या खिशातील २५ हजार रुपये किमतीचा मोबाइल चोरीस गेल्याचे त्यांच्या लक्षात आले. पाचव्या घटनेत टिटवाळा येथील अक्षय बनसोडे (३३) हे थिम्या लोकलने प्रवास करत असताना त्यांच्या खिशातील २२ हजार रुपये किमतीचा मोबाइल चोरला.

# स्थानिक स्वराज्य निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर जड-अवजड वाहनांकरिता वाहतूक बंदी

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**रायगड :** दि.07 फेब्रुवारी 2026 रोजी रायगड जिल्ह्यामध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांची निवडणुकीचे मतदान असल्याने वाहतूक कोंडी कमी करण्याच्या तसेच मतदान कर्तव्य पार पाडण्यासाठी जाणाऱ्या मतदारांचे हक्काचे दृष्टीने उपाययोजना म्हणून मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावर जड अवजड वाहनांच्या वाहतुकीमुळे वाहतूक कोंडी होऊन मतदार मतदानापासून वंचित राहू नये याकरिता सदर मार्गावर वाहतूक नियंत्रित करण्याकामी जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी दि.06 फेब्रुवारी 2026 रोजी सायंकाळी 19.00 ते दि. दि.07 फेब्रुवारी 2026 रोजी दुपारी 15.00 वा. वाजेपर्यत मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग क्र.66 या मार्गावर जड-अवजड वाहनांकरिता (दुध, डिझेल, स्वयंपाकाचे गॅस, औषधे, ऑक्सीजन, भाजीपाला, पाणी इत्यादी जिवनावश्यक वस्तु वाहून नेणा-या वाहनांना वगळून) वाहतूक बंदी अधिसूचना जारी केली आहे.
रायगड जिल्हयात दि.07 फेब्रुवारी 2026 हा स्थानिक स्वराज्य संस्थांची निवडणुक मतदानाचा दिवस आहे. रायगड जिल्हा हा पर्यटक जिल्हा असल्याने संपूर्ण रायगड जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात पर्यटक आपआपली वाहने घेवून येत असतात. पर्यटकांच्या वाहनांमुळे मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत असते. रायगड जिल्ह्यातील मतदार हा उपजिविकेसाठी मोठ्या प्रमाणावर बाहेरच्या जिल्ह्यात तात्पुरता स्थलांतरित आहे व त्यांचे मतदान हे रायगड जिल्ह्यातच असल्याने अशा वेळी असे मतदार हे मोठ्या प्रमाणावर उपलब्ध वाहनांचा किंवा सामुदायिकरित्या मोठ्या प्रमाणावर बसेस बुक करून मतदानाकरीता येण्याची शक्यता आहे. मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक 66 या रस्त्याचे कामकाज अद्यापपावेतो काही ठिकाणी सुरू असल्याने काही ठिकाणी हा रस्ता अरूंद असून या मार्गावरून प्रचंड प्रमाणात जड-अवजड वाहनांची वाहतूक होत आहे. तसेच त्यामुळे या मार्गावर नेहमीच दर शनिवार व रविवार या दिवशी पर्यटनासाठी येणारे पर्यटकांच्या वाहनांच्या लांबच लांब रांगा लागत असून पर्यटकांना प्रवासाकरीता जास्तीचा वेळ लागतो. त्यातच मतदार हे मोठ्या प्रमाणावर मतदानासाठी बाहेर गावातून रायगडमध्ये येण्याची शक्यता आहे. सार्वत्रिक लोकसभा निवडणूक 2024 व विधानसभा निवडणूक 2024 मध्ये मतदारांच्या वाहनांच्या संख्येत वाढ झाल्याने काही ठिकाणी मोठ्या प्रमाणात वाहतुक कोंडीचा सामना करावा लागला होता.
ही वाहतूक बंदी अधिसूचना ही दुध, पेट्रोल, डिझेल, स्वयंपाकाचे गॅस, औषधे, ऑक्सीजन, भाजीपाला, पाणी इत्यादी जिवनावश्यक वस्तू वाहून नेणारी वाहने, पोलीस वाहने, फायर ब्रिगेड वाहने रुग्णवाहीका यांना लागू राहणार नाही.

# राबोडी पोलिसांकडून 52 मोबाईल नागरिकांना परत

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** राबोडी पोलिस ठाण्याच्या परिसरातून चोरीस गेलेले तसेच गहाळ झालेले पाच लाख दहा हजारांचे ५२ मोबाइल मूळ नागरिकांना परत केल्याची माहिती ठाणे शहर परिमंडळ एकच्या प्रभारी पोलिस उपायुक्त मीना मकवाना यांनी शुक्रवारी दिली. आपले मोबाइल सुखरूप परत मिळाल्याने या नागरिकांनी समाधान व्यक्त केले.
राबोडी भागातून गेल्या तीन महिन्यांत गहाळ झालेल्या तसेच चोरी झालेल्या मोबाइलचा शोध घेण्यासाठी वरिष्ठ पोलिस निरीक्षक हेमंत पाटील यांनी हवालदार यशोदा घोडे, सशांक सावंत आणि समाधान माळी यांचे पथक तयार केले. याच पथकाने मोबाइलचा शोध घेण्यासाठी संबंधित मोबाइल कंपनीची सेवा पुरविणाऱ्या कंपन्यांशी पत्रव्यवहार केला. त्याच आधारे मोबाइल कंपनीकडून माहिती मिळविली. त्याच माहितीच्या आधारे पाच लाख दहा हजारांच्या ५२ मोबाइलचा शोध लावला.

# राज्यस्तरीय पॉवर लिफ्टिंग स्पर्धेत गोवेली जीवनदीपच्या विद्यार्थीनींची बाजी

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**गोवेली** : गोवेली येथील जीवनदीप कनिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थीनींनी राज्यस्तरीय पॉवर लिफ्टिंग स्पर्धेत उल्लेखनीय यश संपादन करून महाविद्यालयाच्या नावलौकिकात भर घातली आहे.
इयत्ता १२ वी वाणिज्य शाखेतील कु. गायत्री महेश बेडेकर हिने दिनांक ०३-०२-२०२६ रोजी सातारा येथे पार





पडलेल्या राज्यस्तरीय पॉवर लिफ्टिंग स्पर्धेत ४७ किलो वजनी गटात उत्कृष्ट कामगिरी करत सुवर्णपदकाची कमाई केली. तसेच, इयत्ता १२ वी विज्ञान शाखेतील कु. तनिषा हेमंत भगत हिने ५३ किलो वजनी गटात प्रथम क्रमांक पटकावत सुवर्णपदकावर आपले नाव कोरले.
या दोन्ही यशस्वी विद्यार्थीनींची आगामी राष्ट्रीय पॉवर लिफ्टिंग स्पर्धेसाठी निवड झाल्याने महाविद्यालयात आनंदाचे वातावरण आहे.
या नेत्रदीपक यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष श्री. रविंद्र घोडविंदे, संचालक श्री. प्रशांत घोडविंदे, कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य. प्रकाश रोहणे, क्रीडा शिक्षक,शिक्षकेतर कर्मचारीवर्ग यांनी दोन्ही विद्यार्थीनींचे अभिनंदन केले असून त्यांच्या पुढील क्रीडा वाटचालीसाठी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या आहेत. विद्यार्थिनीच्या या कामगिरी बाबत नातेवाईक मित्रपरिवार यांच्याकडून त्यांच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

# भातपिकाच्या थकीत रकमेसाठी शेतकऱ्यांची प्रतीक्षा कायम

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**मुरबाड** : ठाणे जिल्ह्यातील मुरबाड तालुक्यात आदिवासी विभागामध्ये आदिवासी विकास महामंडळ प्रादेशिक कार्यालय नाशिक अंतर्गत धान(भात) खरेदी करीत असते. खरीप हंगाम २०२४-२५ मधील धानाचे पैसे फेब्रुवारी महिन्याच्या अखेरीस मिळण्याच्या प्रतीक्षेत शेतकरी राजा आहे.
आज माळ मठावर ज्या शेतकऱ्यांनी खरीप हंगाम २०२४-२५ मध्ये आदिवासी विकास महामंडळाकडे भात दिले असून त्याचे पैसे अजूनही शेतकऱ्यांना मिळाले नसल्यामुळे ह्या शेतकऱ्यांनी एकत्रित येऊन आंदोलनाचा पवित्रा घेतला होता.
मुरबाड तालुक्यातील आदिवासी विकास महामंडळ अंतर्गत धसई



केंद्र-४३ शेतकरी,माळ केंद्र-२३६ शेतकरी व पाटगाव केंद्र-२८ शेतकरी असे एकूण ३०७ शेतकऱ्यांचे धान्याचे पैसे अपेक्षित आहेत याबाबत ठाणे-पालघर सहकार बोर्ड संचालक प्रकाश पवार यांनी ठाणे जिल्ह्याचे पालकमंत्री एकनाथजी शिंदे, मुरबाड विधानसभेचे आमदार किसनजी कथोरे,ठाणे जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष सुभाष पवार, जिल्हाधिकारी श्रीकृष्ण पांचाळ,तहसीलदार अभिजित देशमुख यांच्या माध्यमातून आदिवासी विकास महामंडळाकडे खरीप हंगाम २०२४-२५ मधील सातबाऱ्यावरील पीक पेराची नोंद शिथिल करावी यासाठी सातत्याने पाठपुरावा करून शेतकऱ्यांना न्याय देण्याचा भूमिका सरकार दरबारी मांडली होती.
मुरबाडचे आमदार किसन कथोरे यांनी शेतकऱ्यांना दहा दिवसाच्या आत पैसे मिळण्याचे आश्वासन दिले असून १७ फेब्रुवारी २०२६ पर्यंत पैसे न मिळाल्यास १८ फेब्रुवारी रोजी सर्व शेतकरी शहापूर येथील आदिवासी विकास महामंडळाच्या प्रादेशिक कार्यालय समोर आंदोलन करतील असा इशारा सर्व शेतकऱ्यांच्या वतीने देण्यात आला आहे.
खरीप हंगाम २०२५-२६ मध्ये आदिवासी विकास महामंडळाने लवकरात लवकर भात खरेदी सुरू करावी, खरेदीची मर्यादा प्रतिदिनी ३०० क्विंटल ऐवजी १००० क्विंटल करावी अशीही मागणी शेतकऱ्यांच्यावतीने करण्यात आली आहे तरच ३१ मार्च पूर्वी सर्व शेतकऱ्यांच्या भाताची खरेदी पूर्ण होईल.
यापसंगी शेतकऱ्यांच्या बाजूने न्याय मिळावा म्हणून ठाणे पालघर सहकार बोर्डाचे संचालक प्रकाश पवार, जिल्हा परिषद माजी सदस्य संजय पवार,पंचायत समितीचे माजी सदस्य अनिल घरत,किसन आलम, माळ सेवा सोसायटीचे सचिव मधुकर कवटे व मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते.

# १५०० रुपयांचे वीजबील न भरल्याने जिल्हा परिषद शाळा वर्षभर अंधारात

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : निवडणूका डोळयासमोर ठेवून'लाडक्या बहिणीवर मेहरबान सरकारने केलेली'योजनेच्या, गोंडस नावाखाली लाखो करोडोंची उधळण, नुकत्याच झालेल्या वेगवेगळया निवडणुकीत उमेदवारांची झालेली'खरेदी विक्री, त्यांच्यासाठी लागलेल्या कोटींच्या बोली, आणि दुसरीकडे गोरगरीब, आदिवासी, कातकरी समाजातील मुला मुलींच्या हक्काचे शिक्षण देणारी जिल्हा परिषद शाळा केवळ१५००रुपये लाईटबील भरता येत नसल्यामुळे गेल्या १वर्षांपासून अंधारात आहे, या विद्यार्थ्यांना ना पंखा, ना कँम्युटर,?व्वारे" मेक इन इंडिया, डिजिटल इंडिया,बघा गतिमान सरकारचा ,वेगवान निर्णय! मनसेचे ठाणे जिल्हा अध्यक्ष अविनाश



जाधव यांच्या कडे जिल्ह्यातील अनेक शाळांच्या दुरावस्थेबाबत तक्रारी प्राप्त झाल्या होत्या, त्यानिमित्तानं शहापूर तालुका अध्यक्ष शैलेश बिडवी यांच्या सह तालुक्यातील 'खरम्याचा पाडा,या शाळेस भेट दिली असता ही शाळा केवळ १५००रुपये लाईटबील थकल्याने गेल्या वर्षभर अंधारात असल्याचे समोर आले. ही शाळा५वी पर्यंत असून३९पटसंख्या आहे. शाळेस कोणीतरी टिव्ही दिला आहे. परंतु तो वर्षभर सुरू झालाच नाही, पंखे, कँम्युटर तर दूरकीबात?केवळ लाईटच नाही तर, रस्ते, गटारे, पाणी, आरोग्य, याची तर पूरती बोंबाबोंब? काही ठिकाणी तर झेडपी शाळा आहेत की भूतबंगला हेच कळत नाही, लांबच सोडा,,, मुंबई पासून हाकेच्या अंतरावर असलेल्या कल्याण तालुक्यातील अनेक आदिवासी, कातकरी, वाड्या पाड्यात अंगणवाडी, शाळा, आरोग्य केंद्र, रस्ता, नाही लागून असलेल्या मुरबाड ,शहापूर तालुक्यात अजूनही पिण्याच्या पाण्यासाठी वनवन भटकावे लागत आहेत, डोक्यावरुन हंडे आणून तरुण मुली, महिलांचे डोक्याचे केस गेले आहेत. यातूनही एखाद्या कातकरी, आदिवासी कुंटूबांने शासकीय योजनेचा लाभ घेण्याचे ठरवले तर सरकारी बाबू अशी काय अडचण निर्माण करतात की ती योजनाच नको?असे त्यांना वाटतं. अशी कित्येक उदाहरणे कल्याण, मुरबाड, शहापूर मध्ये रोज अनुभवायला मिळत आहे. कागदी घोडे नाचविण्यासाठी मंत्री, आमदार, खासदार, शासकीय वरीष्ठ अधिकारी यांचे सरकारी खर्चातून दौरे, जेवणावळया, खाणावळया,वेगवेगळे ड्रायफ्रूट च्या पार्ट्या झडतात, एक दिवस गाव, वाड्या वसत्या, उजळून निघतात, चकाकत होतात, परंतु नंतर स्मशान शांतता!याला जबाबदार कोण?अनेक संस्था, संघटना, मंडळे या गोरगरीब विद्यार्थ्यांना दफ्तर, कपडे, खाऊ, टिव्ही, कँम्युटर,प्रसंगी, अंगणवाडी, शाळा बांधून देतात! पण मग प्रश्न निर्माण होतो, सरकार कशासाठी?कोणासाठी?मनसेने या खरम्याचा पाडा शाळेची पुढील१०वर्षाची जबाबदारी स्वीकारली आहे, त्यांचे कौतुक करावेच लागेल!




Printed by SIDDHAKALA PRINT SOLUTION LLP Published by GHODVINDE RAVINDRA NARAYAN on behalf of GHODVINDE RAVINDRA NARAYAN,
Printed at Thane and published at Building No-B-24, Room no-9, Gholap Nagar, Murbad Road, Near Anupam Nagar, Kalyan (West). Editor GHODVINDE RAVINDRA NARAYAN.
Contact No. - 908266 4781 / 9619188558 E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024